# शेतकरी संघटक

पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. २५

किंमत १ रुपया

वर्ष ९ वे | २१ जुलै १९९२ | अंक ८ वा


# अयोध्या प्रश्न सोडवण्याची कुणाला इच्छा आहे का हो?

— शरद जोशी.

**अयोध्या पुन्हा पेटत आहे**

अयोध्येत मंदिर-मस्जिद वाद पुन्हा एकदा कडेलोटाच्या अवस्थेस पोचला आहे. ३१ ऑक्टोबर १९९० रोजी अडवाणींच्या रथयात्रेच्या शेवटी हे प्रकरण गरमागरम झाले होते आणि त्याच्या आचेत विश्वनाथ प्रताप सिंग यांचे सरकार पायात वितळून कोलमडले. या वेळच्या उद्रेकात आजचे मध्यवर्ती शासन लगेच कोसळेल अशी काही फारशी शक्यता नाही, पण केन्द्र शासनाने उत्तर प्रदेशातील भा.ज.पा. चे शासन बरखास्त केले आणि त्या राज्यात पुढच्या निवडणुका राममंदिराच्या प्रश्नावरच झाल्या, तर मंदिरवादी आजच्यापेक्षाही मोठ्या बहुसंख्येने निवडून येतील. एवढेच नव्हे तर, मंदिर बांधणीच्या मार्गात व्यत्यय न आणणारे शासन दिल्लीत पाहिजे अशा मुद्द्यावर पुढील सार्वत्रिक निवडणुका झाल्या तर केन्द्रातही मंदिरवाद्यांची सत्ता येणे सहज संभाव्य आहे

**जबाबदारी शासनाचीच**

प्रभुरामचंद्राच्या स्पर्शाने, शिळा बनलेली अहिल्या उद्धरली आणि सजीव झाली तसेच राममंदिराच्या स्पर्शाने नापीक आणि निरर्थक जातीयवादी मंच तरारून वाढत आहेत. हा प्रश्न उठवल्याबद्दल विश्व हिंदू परिषद किंवा भारतीय जनता पार्टी यांना दोष देण्यात फारसा अर्थ नाही. सत्ता टिकावी म्हणून इंदिरा गांधी समाजवादाची, गरिबी हटविण्याची घोषणा करू शकतात तर भा. ज. पा. च्या मंडळींनी रामाविषयी देशभर असलेल्या प्रेमादर भावनेचा उपयोग का करू नये? अयोध्येचा प्रश्न चिघळला आणि त्याचा धोका राष्ट्रीय एकात्मतेलाच वाटू लागला याची जबाबदारी मंदिरवाद्यांकडे नसून वेगवेगळ्या शासनांनी याविषयी घेतलेली निष्क्रीयतेची भूमिकाच या परिस्थितीस जबाबदार आहे. रामजन्मभूमी-बाबरी मस्जिद प्रकरणाचा अलिकडचा इतिहास थोडक्यात असा आहे.

**वादाचा इतिहास**

२३ डिसेंबर १९४९ रोजी काही मंडळी बाबरीमस्जिदीत घुसली आणि त्यांनी मस्जिदीच्या मध्यभागात राममूर्तीची स्थापना केली.

१६ जानेवारी १९५० रोजी फैजाबादच्या कोर्टाने बाबरी मस्जिदीतील मूर्ती हलवू नयेत, ४९ सालापासून तेथे चालू झालेली पूजा-अर्चा चालूच राहावी असा निर्णय दिला.

१ फेब्रुवारी १९८६ रोजी फैजाबादच्याच कोर्टाने मस्जिदीच्या आतील दरवाजास लावलेले कुलूप काढण्याचा आदेश दिला. या संबंधी चार खटले वेगवेगळ्या कोर्टात चालू होते. ते सगळे खटले आता अलाहाबाद हायकोर्टापुढे चालूच आहेत.

३१ ऑक्टो. १९९१ रोजी उत्तर प्रदेशातील भा. ज. पा. शासनाने २.७७ एकर जमीन ताब्यात घेतली व आसपासची काही जमीन मिळून ४२ एकर जमीन आसमंताच्या विकासाकरिता एका न्यासाकडे सोपवली. सुप्रीम कोर्टाने या जमिनीच्या संपादनास मान्यता दिली, पण संपादित जागेवर कायम स्वरूपाचे बांधकाम करू नये असा निर्णय दिला.

प्रस्तावित मंदिराच्या प्रांगणात आता जमीन सपाट केली जात आहे व मोठमोठे चबुतरे बांधले जात आहेत. ही सगळी कारवाई कायदेशीर आहे, कोर्टाच्या नियमास अनुसरून आहे असे उत्तर प्रदेश शासनाचे मत आहे. याउलट, उत्तर प्रदेश शासनाची कारवाई बेकायदेशीर आहे अशी राष्ट्रीय मोर्चा, डावे पक्ष आणि इंदिरा काँग्रेस यांची

भूमिका आहे.

भारतीय जनता पार्टीस मंदिर बांधण्याचा जनादेश आहे आणि त्यापुढे कोणतीही तांत्रिक कायदेशीर अडचण कुचकामी आहे असे मंदिरवादी मानतात. या उलट, मध्यवर्ती शासनालाही अधिक व्यापक जनादेश आहे आणि तो जनादेश निर्धार्मिक एकात्म भारताचे संरक्षण करण्याचा आहे असे इतर पक्ष मानतात.

**राममंदिराचे महाभारत**

हा सगळा इतिहास थोड्याफार तपशिलात मांडला तो काही सगळा इतिहास समजावून सांगण्याकरिता नाही. या तपशिलावरून एवढेच स्पष्ट व्हावे की गेल्या ४३ वर्षांत हे जे सगळे महाभारत घडले त्यात एक बाजू सत्याची आणि दुसरी बाजू खलांची, असे काही नाही. महाभारतात जसे कौरव-पांडव दोघातही दोषांचे वाटप करावे लागते तसेच अयोध्या प्रकरणाचे आहे. प्रश्न न्यायनिवाड्याचा नाही, प्रश्न अटीतटीला जाऊन महाभारत युद्धाप्रमाणे सर्वनाश ओढवून घेण्याचा नाही; प्रश्न व्यावहारिक सोडवणूकीचा आहे, एवढी बाब स्पष्ट व्हावी. अयोध्येचा प्रश्न बिकट झाला, चिघळला याचे कारण केंद्रातील वेगवेगळ्या पक्षांच्या शासनांनी अयोध्येच्या प्रश्नावर आडमुठी आणि निष्क्रीयपणाची भूमिका घेतली.

**'सनानि' धोरण**

राजीव गांधी, विश्वनाथ प्रताप सिंग, चन्द्रशेखर व सध्याचे पी. व्ही नरसिंहराव या चारही पंतप्रधानांच्या शासनांचे धोरण एकच राहिले आहे. या धोरणाचे स्वरूप काय? अयोध्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचा सगळ्यात उत्तम उपाय हा की, हिंदू आणि मुसलमान या दोन्ही जमातींच्या मान्यवर नेत्यांनी एकत्र बसून उभय पक्षांना मान्य होईल असा काही तडजोडीचा ठराव करावा, असा समझोता नच जमला तर या विषयावर न्यायालय जो काही निर्णय देईल तो सर्व संबंधितांनी मान्य करावा असे थोडक्यात हे धोरण आहे - 'समझोता नाहीतर निवाडा', थोडक्यात ''सनानि'' असे हे धोरण आहे.

इतर अनेक बाबतीत परस्परविरोधी भूमिका असलेल्या चार शासनांचे 'सनानि' धोरणाबाबत मात्र एकमत असावे ही मोठी गमतीदार गोष्ट आहे. चार वेगळ्या शासनांनी सनानि धोरण स्वीकारले याचे रहस्य काय? सनानि धोरण नोकरशाहीच्या प्रकृतीस झेपणारे आहे, हे त्याचे खरे इंगित आहे. नाहीतर, सनानि धोरण कोणत्याच कसोटीस उतरत नाही; तर्कशास्त्राच्याही नाही आणि व्यावहारिकतेच्या तर नाहीच नाही.

**समझोता अकल्पनीय**

दोन जमातींच्या मान्यवर नेत्यांच्या समझोत्यातून काही तोडगा निघेल ही कल्पना तर मुळात विचारात घेण्यालायकसुद्धा नाही.

या दोन जमातींचे मान्यवर नेते कोण? हिंदू समाजाचे नेतृत्व भा. ज. पा., बजरंग दल, शिवसेना त्यांच्याकडे आहे असे कुणी मानेल काय? आणि मुल्लामौलवींकडे मुसलमान समाजाचे नेतृत्व आहे असे मानणे अयोग्यच नाही तर मुसलमान समाजातील प्रागतिकांचा घोर अपमान आहे. शहाबानो प्रकरणी मुल्लामौलवींचे नेतृत्व मान्य करण्याची घोडचूक राजीव गांधी यांनी केली, त्याची पुन्हा पुनरावृत्ती करणे नको.

**नेते वाघावर स्वार**

समजा, काही चमत्कार घडला आणि दोनही जमातींचे सर्वमान्य नेते कोण हे एकमताने ठरले आणि अशी नेतेमंडळी एकत्र बसली तरी त्यांच्यात समझोता होण्याची शक्यता शून्यसुद्धा नाही. समझोता करायचा म्हणजे एका पक्षाची शरणागती हे फारसे संभवत नाही. उभयपक्षी थोडातरी समजूतदारपणा, तडजोड, देवाणघेवाण करण्याचे सामर्थ्य असले पाहिजे. दुर्दैवाने, जगात-नेतृत्वात हे सामर्थ्य असू शकत नाही. या नेत्यांची स्थिती वाघाच्या पाठीवर बसलेल्यासारखी झाली आहे. पाठीवर फार काळ बसून राहणे शक्य नाही आणि खाली उतरावे तर वाघच चट्टामट्टा करण्याची निश्चिती. जो कुणी हिंदू किंवा मुसलमान नेता काही तडजोड करण्याची तयारी दाखवेल त्याची लगेच हुर्रेवडी उडवली जाईल आणि देशद्रोही, धर्मद्रोही अशी त्याची संभावना होईल. एवढी हिंमत कोणत्याच जमातीच्या नेतृत्वात नाही.

**एक तिसरी जमात**

पण याहीपेक्षा, एक महत्त्वाचा प्रश्न उभा ठाकतो. मस्जिद राहावी की मंदिर राहावे की दोघांच्या मधला काही 'मध्यम मार्ग' रहावा? या प्रश्नाचा निर्णय काय फक्त मंदिरवादी आणि मस्जिदवादी या दोघांच्याच स्वारस्याचा आहे? मला स्वतःला मंदिरातही स्वारस्य नाही आणि मस्जिदीतही नाही. पण माझा आग्रह आहे की पुराणकालीन किंवा इतिहासकालीन वास्तू आहेत तशा जतन कराव्यात, त्यात फेरफार असे करूच नयेत. इतिहासातील धामधुमीच्या काळात देऊळ उध्वस्त करून त्या जागी मस्जिद बांधलेली असेल तर त्यावेळी झालेल्या राष्ट्रीय मानहानीची भरपाई आता ह्या काळात मस्जिदीच्या जागी पुन्हा मंदिर बांधल्याने कशी काय होईल? इतिहासात घडलेल्या मानभंगाचा जुनाट पद्धतीने बदला घेण्याचा प्रयत्न करणे म्हणजे ''डॉन क्विक्झोटगरी' आहे. जुन्या काळातल्याप्रमाणे शिलेदाराचा पोशाख करून, घोड्यावर स्वार होऊन, हाती तलवार, बर्ची घेऊन आज कोणी निघेल तर त्याची रवानगी येरवड्याच्या इस्पितळातच होईल. इतिहासातील मानभंगाची भरपाई कशी करावी याचे उदाहरण आपल्या डोळ्यादेखत नुकतेच जर्मनीत घडले आहे. पश्चिम जर्मनीने कठोर परिश्रमाने आणि कल्पकतेने राष्ट्राचे आर्थिक सामर्थ्य इतके वाढवले की पूर्व जर्मनीतील जनसामान्यास पश्चिम जर्मनीचा नागरिक होण्याचे भाग्य मिळावे अशी तहान लागली. इतिहासाचा विचार करत राहिलो तर वर्तमानही हातातून निसटून जाईल. भारताने जर पश्चिम जर्मनीसारखा आर्थिक चमत्कार घडवून

दाखवला तर अफगाणिस्थान, पाकिस्थान, सिलोन, ब्रह्मदेश, नेपाळ, इंडोनेशिया, मलेशिया, कंबोडिया, थायलंड यांसारखे भारतापासून दूर झालेले प्रदेश पुन्हा भारताजवळ येण्याची पराकाष्ठा करू लागतील. इतिहासात पराभूत झालेले आम्ही, वर्तमानात जागतिक दारिद्र्य रेषेखालचे आम्ही निरर्थक राष्ट्रीय मानापमानाच्या गप्पाच करत राहिलो तर भविष्यातही या दुर्दैवी देशाचा माथा उजळ होण्याची काहीही शक्यता नाही.

माझ्या सारख्यांना असे वाटते की या ऐतिहासिक वास्तू 'जैसे थे' राहाव्यात. त्यांच्याकडे पाहून मनाला खंत वाटत असेल तर त्याचा उपयोग देशाची आर्थिक ताकद वाढवण्याकरिता करावा. देशाची आर्थिक ताकद वाढू लागली म्हणजे थोड्याच दिवसांत असा काळ येणार आहे की पडलेल्या देवळांचे अवशेष पाहून आक्रमकांच्या वारसदारांनाच आपल्या पूर्वजांच्या संस्कृतीहीनतेबद्दल शरम वाटू लागेल. आणि त्यांच्या बर्बरतेचे हे सज्जड पुरावे झाकून टाकावे असे त्या वारसदारांनाच वाटेल.

अयोध्या प्रश्नांचा निकाल लावतांना माझ्यासारख्यांच्या या जमातीला काही स्थान मिळणार आहे किंवा नाही? आमचे कुणी ऐकणार आहे का नाही? का सारा मामला उभयपक्षांच्या कठमुल्लांवरच सोपवला जाणार आहे? उभय पक्षांच्या समझोत्याने हा वाद मिटावा ही कल्पना किती तर्कहीन आहे हे आणखी सिद्ध करण्याची जरुरी नाही.

समझोत्यावर आता कुणी फारशी आशा ठेवून बसलेलेही नाही. काही शंकराचार्यांची आणि मान्यवर मुसलमान बुजुर्गांची नावे काही काळ पुढे आली पण हा सगळा मामला आता थंडावला आहे.

**भरंवसा कोर्टावर**

परिणामतः या विवादाचा निकाल कोर्ट काय लावील तोच, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. समझोत्याने वाद सुटणार नाही, कोर्टाच्या निर्णयाने वाद सुटणे त्याहीपेक्षा अशक्य.

**कोर्टाचा विषयच नाही**

कोर्टापुढे निर्णय व्हायला मामला काही जमिनीच्या मालकीपत्राच्या किंवा सातबाराच्या उताऱ्याचा नाही. हिंदुत्ववाद्यांचा या विषयावरील युक्तिवाद समर्थनीय आहे. कोणत्याही समाजाची श्रद्धा हा विषय कोर्टाच्या अधिकारातला असूच शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने १९८९ साली दिलेल्या एका निर्णयातील शेवटचे वाक्य असे आहे –

''या वादात कोर्टापुढे आलेल्या प्रश्नांपैकी काही न्यायव्यवस्थेने सुटू शकतील किंवा नाही याबद्दल जबरदस्त शंका आहे.''

**कज्जेदिरंगाई**

तसे हे सगळेच प्रकरण अगदी आधुनिक काळातसुद्धा न्यायालयांपुढे १९४९ सालापासून पडलेलेच आहेत. ४३ वर्षांत न्यायालयापुढील वाद अधिकाधिक किचकट होत चालला, एवढाच काय तो फरक. पूर्वी वाद मस्जिदीच्या आणि आसपासच्या जागेपुरताच होता. ऑक्टोबर ९१ पासून उत्तर प्रदेश सरकारने संपादन केलेल्या जमिनीबद्दलचा आणि तिच्या वापराबद्दलचा एक नवाच वाद उपस्थित झाला आहे.

**खटल्यांना अंत नाही**

बरे, कोर्टाचा निर्णय तरी कोठे अंतीम असतो? बॅ. अंतुले यांनी दाखवून दिले आहे की साधने मुबलक असली, सज्जड वकील मंडळी उभी करता आली तर अपिलावर अपील अशा कोर्टाकोर्टातून येरझारा करीत अनंत काळपर्यंत खटला चालू ठेवता येतो; उच्च न्यायालयाच्या एका पीठाने दिलेला निर्णय दुसऱ्या पीठाकडून बदलून घेता येतो. एका व्यक्तिसंबंधीच्या खटल्यात असे होते तर दोन जमातींची प्रतिष्ठा ज्या प्रश्नात गुंतली आहे त्या प्रश्नाचा निकाल अखेरचा असा कोठे लागेल हे काही फारसे शक्य नाही.

**अंमलबजावणी करणार कोण?**

आणि समजा, कोर्टाने निकाल दिला, पण तो निकाल अंमलात आणण्यासारखा नसेल तर? निकाल अमलात आणण्यासाठी भारताची सारी सशस्त्र फौज तैनात करावी लागत असेल तर? आयोध्येच्या प्रश्नात असे होऊ शकते. मस्जिदीत १९४९ साली प्राणप्रतिष्ठा केलेली रामाची मूर्ती तेथून काढून टाकावी, कारण ती उघड उघड अलीकडे अलीकडे अगडी उदंड आक्रमणाने बसवण्यात आलेली आहे असे कोर्टाने ठरवले तरी त्या निर्णयाची अंमलबजावणी करणार कोण? आणि मस्जिद हलवण्यात यावी, तिची पुनर्बांधणी अगदी सन्मानाने इतरत्र करण्यात यावी असे महासर्वोच्च न्यायालयाने सांगितले तरी त्या अंमलबजावणीची किंमत मोजणार कोण?

या पलिकडेही एक गोष्ट नजरेआड करून चालणार नाही. भारतीय घटनेत न्यायव्यवस्था ही काही इतर व्यवस्थांपेक्षा वरचढ ठेवलेली नाही. संसद, प्रशासन यांच्या सारखीच ती एक व्यवस्था आहे. एखाद्या कायद्याच्या कलमाप्रमाणे कोर्टाने निर्णय दिला तर त्या कायद्याचे कलम विधानसभा किंवा लोकसभा बदलू शकते. निवडणुकीमध्ये असे कलम बदलण्याचा विशेष जनादेश मिळू शकतो किंवा विशेष अधिकार वापरून न्यायालयाचे निर्णय बाजूला ठेवणे कायदेमंडळास सहज शक्य आहे. संसदेने असे केले आहे, अगदी पुर्वानुलक्षी कार्यवाहीसह.

**''सनानि'' भाकड**

थोडक्यात गेल्या चार पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील शासनांनी पाठपुरावा केलेले 'समझोता नाही तर निवाडा' हे धोरण अगदी निरर्थक आणि भाकड आहे. सरकार निष्क्रीयपणे स.ना.नि धोरणाचा पुन्हा पुन्हा रटाळपणे पुनरुच्चार करत आहे आणि या सगळ्या काळात परिस्थिती अधिकाधिक बिघडते आहे.

**मंदिरवाद्यांची चलाख चाल**

आम्ही न्यायालयाची सत्ता मानणार नाही, असे कुणीच म्हणत नाही; अगदी उत्तर

प्रदेशाचे मुख्यमंत्रीसुद्धा म्हणत नाहीत. अगदी उलटे, तेही जाहिररित्या सनानि धोरणाचाच पुरस्कार करतात. ''अयोध्याविवादावर सर्वमान्य तोडगा शोधण्याची पराकाष्ठा केली पाहीजे, तोडगा सापडेपर्यंत मंदिर आणि मस्जिदीच्या वास्तूंचे पूर्ण संरक्षण केले पाहिजे. कोर्टाच्या आज्ञांचे उल्लंघन होणार नाही.'' असेच ते निक्षून सांगत आहेत. कारण उघड आहे. जाहिररित्या असे बोलण्याखेरीज त्यांना गत्यंतरच नाही. कोर्टाचा निवाडा न जुमानता आम्ही मस्जिद पाडू, मंदिर बांधू असे ते बोलले तर त्यांचे सरकार ताबडतोब बरखास्त होईल. असा धोका घेण्याचे त्यांना काय कारण? त्यांचा डावपेच मोठ्या बुद्धिकुशलतेने ठरला आहे. जे जे कायदेशीरपणे होईल ते ते कायदेशीरपणेच करण्याचा त्यांचा विचार आहे. ४२ एकर जमिनीचे संपादन झाले, त्याला न्यायालयाची मान्यता मिळाली. अमूक वास्तू पाडणे योग्य होते किंवा नाही, नवीन बांधलेली एखादी खोली, एखादी कोठी, एखादी भिंत, एखादा चबुतरा कोणा एका न्यायालयाच्या एखाद्या निर्णयाशी विसंगत आहे काय? असल्या प्रश्नांचा गुंता थोड्याच काळात इतका वाढेल की न्यायसत्तेचे आदेश आपोआपच परिणामशून्य व निष्प्रभ होतील. अशी सगळी तयारी झाली म्हणजे शिवसेना, बजरंगदल असा एखादा टोळभैरव गट एखाद्या रात्रीत जे बेकायदेशीर कर्म उरकायचे ते उरकून टाकेल. ३१ ऑक्टोबर १९९१ ला मस्जिदीच्या छतावर काही 'वीर' चढलेच ना? दिवसाढवळ्या खुलेआम मुंबईतील क्रिकेटची खेळपट्टी उध्वस्त करण्यात आलीच ना?

**कल्याणसिंग नामानिराळेच**

हे काम असे एका रात्री उरकले जाईल. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री कल्याणसिंग यांचे पोलिस काम उरकल्यानंतर तत्परतेने हजर होतील. पाचपन्नास लोकांना अटकही करतील. त्यांच्यावर खटलाही चालेले. कदाचित्, त्यांना शिक्षाही होतील. मुंबईची खेळपट्टी उखडल्याबद्दल जसे झाले तसे सगळे पोलिसांच्या साक्षीने आणि सहकार्याने होईल. असे झाले तर त्यात शासनाचा काय दोष? मुंबईची खेळपट्टी उखडल्यावर कायदा आणि सुव्यवस्था ढासळली म्हणून सुधाकरराव नाईकांचे मंत्रीमंडळ जर बरखास्त झाले नाही तर कोणी गावगुंडांनी एक मस्जिद पडली म्हणून कल्याण सिंगाचे मंत्रिमंडळ कसे बरखास्त करता येईल? विशेषतः, कागदोपत्री, सरकारने त्या गांवगुंडाविरुद्ध यथायोग्य कारवाई केलेली दिसत असेल तर मग हताशपणे झालेले पाहात राहण्यापलिकडे काही गत्यंतर राहणार नाही. बलात्कार होऊन गेला, मग नंतर करायचे काय? आणि जे करायचे त्याचा फायदा काय?

अयोध्येच्या नाटकातला शेवटचा अंक चालू आहे. बलात्काराचा प्रवेश शेवटचा आहे. त्याच्या आधीचा प्रवेश चालू आहे आणि सर्व संबंधित मंडळी आणि शासन ''स.ना.नि.'' धोरणाच्या गुंतावळ्यात स्वतःला अधिकाधिक जखडून घेत आहे.

**अयोध्येची सोडवणूक**

अयोध्येचा प्रश्न सोडवायला काही कठीण नाही. नोकरशाहीला सोयीस्कर असे निष्क्रीयतेचे धोरण सोडून नवी झेप घेण्याची तयारी फक्त पाहिजे.

हा प्रश्न सोडवण्यात कठीण ते काय आहे? चार प्रश्नांवर एकमत सहज दिसून येते

१) रामजन्मभूमी मंदिर बांधले गेले पाहिजे आणि ते मंदिर रामाच्या जनमानसातील स्थानाशी मिळतेजुळते असे भव्यदिव्य असले पाहिजे.

२) सध्या अस्वित्वात असलेल्या कोणत्याही पूजा स्थानाला धक्का लागता कामा नये. रामाचे जन्मस्थान त्रिमीतीत नेमकें कोणते हे कोणालाच ठाऊक नाही. परंपरेने आणि श्रद्धेने जे जन्मस्थान मानले जाते त्याच्या जवळात जवळ मंदिराचे गर्भगृह असावे.

४) मंदिराची बांधणी एका कालबद्ध कार्यक्रमाप्रमाणे पार पाडली पाहिजे.

या खेरीज पाचव्या एका मुद्द्यावर राष्ट्रीय सहमती होण्यास काही एक अडचण पडू नये. इतके ऐतिहासिक महत्त्वाचे स्थापत्यकार्य कोणा येरागबाळ्या पक्षाकडे, संस्थेकडे किंवा न्यासाकडे सोपवणे उचित होणार नाही. ही जबाबदारी केंद्रशासनानेच घेतली पाहिजे. लालकृष्ण अडवानी यांनीही सोमनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीकरिता सरदार वल्लभभाई पटेल यांनी अंमलबजावणी केलेल्या कार्यक्रमाची अनेकवेळा प्रशंसा केली आहे. तेव्हा अयोध्येचे राममंदिर सोमनाथ मंदिराच्या पद्धतीनेच बांधले जावे हे योग्यच होईल.

ही जबाबदारी केंद्र शासनाने घेतली म्हणजे वर दिलेल्या सहमतीचे चार मुद्दे लक्षात ठेवून बांधकामाचा नकाशा तयार करणे हे स्थापत्यशास्त्रज्ञांचे काम होईल आणि ते खरे त्यांचेच काम आहे. स्थापत्यशास्त्रातील प्रश्न म्हणून अयोध्यावादाकडे पाहिले गेले असते तर वाद इतका चिघळलाच नसता. आजपर्यंत हा वाद महसूली आहे, न्यायिक आहे, राजकीय आहे, धार्मिक आहे असा गहजब करून एक लहान जखम नासवण्यात आली. केंद्र शासनाने मुत्सद्देगिरी दाखवली, हिंमत दाखवली तर स्थापत्यशास्त्रज्ञ अजूनही काळ्याकुट्ट अंधारात प्रकाशाची एक शलाका दाखवू शकतील.

❖ ❖ ❖

# कार्यकर्त्यांना प्रशिक्षणाअभावी निराधार वाटते

– श्री. विठ्ठल भंडरवाड, कोसमेट (नांदेड)

प्रशिक्षण हा शेतकरी संघटनेच्या कार्यपद्धतीचे अविभाज्य अंग आहे. हे प्रशिक्षण प्रत्यक्ष आंदोलनात होत असते, अधिवेशनात होत असते, मेळाव्यात, संमेलनात, बैठकांतही होत असते. पण शेतकरी संघटनेचा विचार सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये पोहोचविण्यासाठी या पातळ्यांवरील प्रशिक्षण कार्यकर्त्यांच्या दृष्टीने अपुरे पडते. यापूर्वी आंबेठाण येथे जी दहा दिवसांची प्रशिक्षण शिबीरे होत त्यात प्रशिक्षण घेतलेल्या कार्यकर्त्यांना शेतकरी संघटनेचा विचार व कार्यक्रमांमागील भूमिका शेतकऱ्यांना समजावून सांगणे सुलभ होत असे. असे प्रशिक्षित कार्यकर्ते आपल्या भागातील कार्यकर्त्यांसाठी तीन-चार दिवसांची प्रशिक्षण शिबिरेही घेऊ शकत.

देशातील सध्याच्या बदललेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने शेतकरी संघटनेने सध्या जाहीर केलेला चतुरंग शेतीचा आर्थिक आंदोलनाचा कार्यक्रम सभासंमेलनात आदरणीय शरद जोशी व अन्य नेत्यांकडून ऐकला की त्यावेळेपुरता समजतो. पण त्याचा सखोल अभ्यास करण्याची दिशा व संधी न मिळाल्यामुळे तो सर्वसामान्य शेतकऱ्यांसमोर मांडणे कार्यकर्त्यांना जमत नाही. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांची, आवश्यक त्या शिक्षणाची संधी न मिळाल्याने, स्वतः विचार व अभ्यास करून नेत्यांनी मांडलेल्या संकल्पनांचा विस्तार करून मांडण्याची क्षमता नाही. त्यांना अजूनही प्रशिक्षणाचा आधार आवश्यक आहे. प्रशिक्षणाअभावी लोकांना कार्यक्रम समजावून सांगता येत नाही याचे दुःख मनात बाळगून कार्यकर्ते आपला स्वतःवरचाच विश्वास गमावू लागले आहेत. शेतकरी संघटनेने पुन्हा एकदा कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम सुरू करणे आवश्यक आहे.

देशाच्या सध्याच्या परिस्थितीच्या नवीन संदर्भात आता त्याच जुन्या अभ्यासक्रमाप्रमाणे शिबिरे घेणे आवश्यक नाही आणि ते उचितही नाही. माझ्या मते शेतकरी संघटनेने शेगाव मेळाव्यात घोषित केलेल्या आर्थिक आंदोलनासाठी कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करण्याकरिता पुढीलप्रमाणे अभ्यासक्रम असलेली शिबिरे आयोजित करावी.

१) **प्रस्तावना –**

१९७८ ते १९९० पर्यंतच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थितीचा आढावा – त्यानुसार शेतकरी संघटनेने घेतलेले कार्यक्रम – आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थितीत आज झालेला बदल व त्यानुसार घ्यावयाचे कार्यक्रम – आजपर्यंत शासनाने घेतलेल्या शेतकरीविरोधी निर्णयांमुळे शेतकऱ्यांवर देशावर झालेले परिणाम – आज शेतकऱ्यांसाठी व देशासाठी उपलब्ध झालेली विकासाची संधी.

२) **चतुरंग शेती –**

**(क) सीताशेती :** आजपर्यंत राबविलेल्या शेतीपद्धतींमुळे, विशेषतः हरितक्रांती म्हणून केलेल्या शेतीपद्धतीमुळे शेतकऱ्यांपुढे व देशापुढे निर्माण झालेले प्रश्न – उदाहरणार्थ, पर्यावरण, जमिनीची निःकृष्ठता, हलके अन्नधान्य, बिघडलेले नैसर्गिक संतुलन, पाण्याची खोल खोल जाणारी पातळी, वाढलेला उत्पादनखर्च, बियाणे, खते, औषधे, औतऔजारे इत्यादींबाबत शेतीचे परावलंबन.

नव्याने उपलब्ध झालेल्या विकासाच्या संधीच्या या काळात येथून पुढे करावयाच्या शेतीत जमिनीची उत्पादकता सुधारणे व टिकविणे, नैसर्गिक संतुलन सुधारणे व टिकविणे, शेतीचे परावलंबन कमी करणे, सकस अन्नधान्ये उत्पादित करणे, स्वतःचे तंत्रज्ञान उपयोगात आणणे – शेती करण्याच्या परवडण्याजोग्या पद्धतीचा शोध घेणे – बिघडलेले पर्यावरण दुरुस्त करणे, पाण्याची खोल गेलेली पातळी वर आणणे – इत्यादी.

**(ख) माजघर शेती :** प्रक्रिया करणे, प्रक्रिया करण्याचे स्वतःचे तंत्रज्ञान विकसित करणे, प्रक्रिया उद्योगासंबंधी माहिती गोळा करणे व शेतकरी स्त्रीपुरुषांना पुरविणे.

**(ग) व्यापार शेती :** शेतीत व माजघर शेतीत तयार झालेल्या मालाच्या विक्रीव्यवस्थेसाठी प्रायव्हेट लिमिटेड कंपनी, जॉईंट स्टॉक कंपनी इत्यादींच्या स्वरूप व कार्यपद्धतीषियी माहिती देणे, राज्यभर व देशभर दुकानांची जाळी निर्माण करण्याबाबत मार्गदर्शन करणे, देशाच्या वेगवेगळ्या भागातील बाजारपेठांचा मागणी पुरवठ्यासंबंधी अभ्यास.

**(घ) निर्यात शेती :** परदेशात शेतीमाल किंवा प्रक्रिया केलेल्या वस्तू निर्यात करण्याच्या व्यवस्थेची माहिती – वेगवेगळ्या देशात असलेल्या मागणीपुरवठ्याच्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा अभ्यास.

३. **परिणाम –**

वरील कार्यक्रम दहा बारा वर्षे राबविल्यानंतर होणारे संभाव्य परिणाम – शेती व शेतकऱ्यांचा विकास – देशाचा विकास – विकासाची वाढत जाणारी गती.

४. **आंदोलन –**

माजघर शेती, व्यापार शेती, निर्यात शेती करण्यावरील शासनाची बंधने उठविणे आवश्यक आहे – नवीन उद्योगनीतीमध्ये शासनाने उद्योगांना ज्या सवलती दिल्या त्या सवलती शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी देशभरातून शेतकरी आंदोलन

उभे करणे गरजेचे आहे – या नवीन परिस्थितीत आंदोलनाचे तंत्र कसे असावे?

५) **महिला –**

महिलांचा प्रश्न, नवीन व्यवस्थेत महिलांचे स्थान, महिलांचा मालकी हक्क, लक्ष्मीमुक्ती कार्यक्रम इत्यादी.

सारांश, या आधी शेतकरी संघटनेची शिबिरे 'शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती' या पुस्तकाच्या आधारे घेतली जात होती, आता बदलत्या परिस्थितीत 'राष्ट्रीय कृषिनीती' या पुस्तकाच्या आधाराने कार्यकर्त्यांची शिबिरे घेतली पाहिजेत.

❖ ❖ ❖

# अनिवासी भारतीय ठेवी परत घेऊ लागले

## भारत पुन्हा एकदा परकीय चलनाच्या संकटात

वर्षभरापूर्वी देशामध्ये खुल्या अर्थव्यवस्थेचे ढोल वाजायला लागल्यानंतर अर्थमंत्र्यांनी अनेक घोषणा केल्या. त्यात परदेशातील अनिवासी भारतीयांनी भारतातील उद्योगधंद्यात गुंतवणूक करण्याचे आवाहन त्यांनी केले होते. व्याजाच्या दराबाबत घासाघीस होऊन शेवटी अनिवासी भारतीयांनी गुंतवणुकीस सुरुवात केली.

नवीन औद्योगिक धोरण जाहीर झाले तेव्हा लक्षात आले की हे धोरण आजपर्यंत देशाचे आर्थिक वाटोळे केलेल्या उद्योगधंद्यांचेच हितसंबंध जपणारे आहे. त्यावेळी शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले होते की गुंतवणुकीची कितीही आवाहने केली तरी असे समजण्याचे कारण नाही की अनिवासी भारतीय किंवा अन्य कोणी आतुरतेने भारतात भांडवल गुंतविण्यास तयार आहेत. संपूर्ण अर्थव्यवस्थेत खऱ्या अर्थाने बदल होणार असतील तरच हातात पैसा असलेले अनिवासी भारतीय आपले भांडवल येथे गुंतवतील.

आता हे चित्र स्पष्ट होऊ लागले आहे. इकॉनॉमिक टाईम्स् च्या १५/७/९२ च्या अंकातील एका बातमीत म्हटले आहे की सुरुवातीला अनिवासी भारतीयांनी भारतामध्ये गुंतविलेले परकीय चलनातील भांडवल तसेच परदेशात रुपयांच्या रूपात गुंतवलेले भांडवल ते आता परत घेऊ लागले आहेत. १९९१-९२ या वर्षामध्ये अशा तऱ्हेने परत काढून घेतलेली रक्कम जवळ जवळ १७० कोटी डॉलर इतकी होती. रकमा काढून घेण्याचा वेग वाढत असून १९९२-९३ च्या पहिला दोन महिन्यांत अनिवासी भारतीयांनी २६ कोटी ४० लाख डॉलर काढून घेतले. रकमा गुंतविण्याचे प्रमाण त्यामानाने अत्यंत अल्प आहे. १९९०-९१ मध्ये अनिवासी भारतीयांची भारतातील गुंतवणूक अवघी २२ कोटी ९० लाख डॉलरची होती. नंतरच्या वर्षात या गुंतवणुकीत काही लक्षणीय वाढ झाली नाही. उलट, रकमा परत घेण्याचे प्रमाण चढत्या मानाने वाढत आहे. देशातील वाढती आयात, निर्यातवाढीच्या नावाने ठणठण आणि नगण्य नवीन गुंतवणूक लक्षात घेता आज हातात असलेला सुमारे ६५० कोटी डॉलरचा परकीय चलनाचा साठा धोक्यात आला आहे. अनिवासी भारतीयांच्या रकमा परत नेण्याचा कल असाच राहिला तर पुन्हा एकदा भारतासमोर परकीय चलनाचे संकट उभे राहाणे अपरिहार्य आहे.

# राम-मस्जिद करने में जाता क्या है?

**– मानवेंद्र प्राकृत्येय**

राम मंदिर के संसद में उछलते ही सारे मुद्दे एक कोने में पटक दिए गए हैं। सरकार अविश्वास-प्रस्ताव की सांसत में हैं। वी. पी., अडवानी के बीच गुप्त समझौते से नरसिंहराव के बचे-खुचे बाल खड़े हो गए हैं। सारा देश सूखे के 'आतंक' से सिहर रहा है, उधर अयोध्या में मंदिर बनाने का काम शुरू कर दिया गया है। आदमी को सब से पहले रसोईघर की जरूरत होती है लेकिन वहां राम के लिए पहले सिंहद्वार बनाया जा रहा हैं। शायद राम का प्रवेश पहले कराया जाएगा, अब तक राम वहां नहीं होंगे?

आश्चर्य है सरकारों की ताकतों पर। आम आदमी झोपड़ी भी बना लेता है तो उसे मनपा का एक अदना सा कर्मचारी तोड़ देता है। बर्बाद कर देता है। यहां जबर्दस्ती इतना बड़ा निर्माण चल रहा है, सरकार चुप है। यदि मस्जिद हिंसा का केंद्र नहीं होना चाहिए तो यह अधिकार मंदिर को किसने दिया है? सरकार उस जगह को बाबरी मस्जिद कहती है? अर्थात वह स्वीकारती है कि वहां मस्जिद ही है? फिर राजीव गांधी ने राम मंदिर के कथित ताले क्यो खुलवाए थे, इसका जवाब क्या है? यदि झगड़ा 'राम-बाबर' का ही है तो मस्जिद का नाम बदल कर 'राम-मस्जिद' करने में क्या जाता है? राम-मस्जिद के नाम पर बाबरी-मस्जिद को करने के बाद कौन हिंदू अशोक सिंघल बनकर वहां फावड़ा चलायेगा?

सब खुला खेल फरक्काबादी है? इंका-भाजपा-जद सब अपनी-अपनी हद में अयोध्या को लेना चाहते हैं ताकि 'वोट-बैंक' बना सकें? लेकिन इतना तो सोचना चाहिए कि जब एक 'हर्षद' सचमुच के बैंक ढहा सकता है तो यह देश तो हर्षद का है।

जनता को चाहिए कि वह संगठित हो, सड़कों पर उतरे, इन मसीहाओं को सड़कों पर खीचे और उनसे पूछे कि क्या इसीलिए उन्हें दिल्ली भेजा गया था? क्या 'राम मंदिर' के बनने-गिरने पर भी देश बनेगा-गिरेगा? तमाशा बहुत हो चुका है। अब और सहन नहीं किया जाना चाहिए। बच्चे स्कूल जाने के लिए तरस रहे हैं, बीवी ब्लाउज के बिना अधनंगी जी रही है, आदमी का लहू रोज-रोज पाव दो पाव कम होता जा रहा है? मौत का तांडव नृत्य अलग जारी हैं। इन सरकारों और मसीहाओं को जूतियाया जाना जरूरी हो गया हैं।

(दै. आज का आनंद, पुणे १७.७.९२ वरून साभार)

# मन मोहनाऽऽ बडे झूटे ...

*गुरुवार दिनांक १६ जुलै १९९२ रोजी शेअर गैरव्यवहार प्रकरणी लोकसभेतील सदस्यांची गरमागरम चर्चेची खुमखुमी शमविल्यानंतर अर्थमंत्री डॉ. मन मोहन सिंगांची गाडी आर्थिक पुनर्रचनेकडे वळली. आर्थिक पुनर्रचना करतांना फारच दुःखद मोडतोड (कशाची?) होऊ नये यासाठी किमान दोन तीन वर्षांचा कालावधी 'श्वास घेण्याचा' म्हणून मिळाला पाहिजे. ते पुढे म्हणाले,*

***काय म्हणता!***

*मोठ्या उद्योगधंद्यांना दिलेले अवास्तव संरक्षण म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विरोधातील सर्वांत मोठा पक्षपात होता. त्यामुळे उत्पन्न आणि मालमत्ताधारणा यांबाबतीत प्रचंड विषमता निर्माण झाली आहे. उद्योगधंद्याचे संरक्षण काढून घेऊन ही विषमता दूर करायला पाहिजे.*

***असंही म्हणता!***

*पण इतकं झाल्यावर डॉ. मन मोहन सिंगांनी कर्जमाफी योजनेवर जोरदार टीका करून म्हटले की शेतकऱ्यांमध्ये कर्ज परत न फेडण्याची प्रवृत्ती वाढू लागली आहे. ते असेही म्हणाले की कर्जमाफीऐवजी ग्रामीण भागाच्या आसपासच खरे तर बिगरशेती रोजगाराची निर्मिती करायला हवी होती. त्यामुळे शहरी भागाकडे येणारा ग्रामीणांचा लोंढा थांबला असता. (इकॉनॉमिक टाईम्स् १७/७/९२)*

*शेअर गैरव्यवहार प्रकरणातील गरमागरम चर्चेने दमणूक झालेल्या सदस्यांना अर्थमंत्र्यांनी केलेल्या या भाषणातील विसंगती दिसली नाही का? का लोकसभेत हे असेच चालायचे?*

# धान्याची आयात : बुडत्याचा पाय खोलात

मागच्या महिन्यात कॅनडाकडून १० लाख टन गहू आयात करण्याचा निर्णय इंडिया शासनाने घेतला आणि तो गहू अजून भारताच्या किनाऱ्यावर पोहोचला नाही तोवर आणखी ५ लाख टन गव्हाची आयात करण्याचा शासन विचार करू लागले आहे. इतके करूनही या हंगामाच्या शेवटापर्यंत सरकार जनतेला पुरेसा अन्नधान्य पुरवठा करण्याच्या अवस्थेत असणार नाही अशी भीती धान्यव्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

व्यापाऱ्यांच्या अंदाजाप्रमाणे १ जूनचा २० लाख टनांचा शिलकी साठा, जूनपर्यंत शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला ६३ लाख टन १० हजार टन आणि कॅनडाकडून आयात केलेला १० लाख टन असा सर्व मिळून फक्त ९३ लाख १० हजार टन गहूच सरकारकडे शिल्लक आहे. देशाला दरमहा आठ लाख टन म्हणजे वर्षाला ९६ लाख टन गहू आवश्यक आहे. हे लक्षात घेता या हंगामाच्या शेवटी गहू पुरवठ्याची परिस्थिती अत्यंत वाईट होणार असल्याचे व्यापारी अंदाज आहेत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे भारतातील शेतकऱ्यांच्याकडून विकत घेतलेल्या गव्हाचे प्रमाण गेल्या वर्षीपेक्षा २७ लाख टनांनी कमी आहे. २५० रु. प्रति क्विंटल आधारभूत किंमतीवर केंद्र शासनाचा प्रतिक्विंटल २५ रुपयाचा बोनस तसेच राज्य शासनांचे बोनस (पंजाब, हरयाणा, उत्तर प्रदेश - ५ रु. व मध्यप्रदेश २५ रु.) असे अमिष दाखवूनसुद्धा, अनेक खरेदी केंद्रे, अगदी फिरती खरेदी केंद्रे उघडूनसुद्धा शेतकरी इतक्या कमी किंमतीत आपला गहू शासकीय खरेदी यंत्रणेस द्यायला तयार नाहीत. शेतकऱ्यांनी गहू शासनास विकलाच पाहिजे अशी सक्ती करण्याचा प्रस्तावही अजून पुढे कोणी मांडलेला नाही. व्यापाऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे या हंगामात शासनाने किमान ३० लाख टन गव्हाची आयात करणे आवश्यक आहे. यंदाच्या मान्सूनने दगा दिला तर इतर अन्नधान्यांचे उत्पादन कमी होईल आणि त्यांच्या अभावी गव्हाची मागणी वाढेल. गव्हाच्या बाबतीत शासनाने घेतलेल्या या शेतकरीविरोधी पवित्र्यामुळे गहू उत्पादक प्रदेशातील शेतकऱ्यांनी गव्हाखालील क्षेत्र कमी करून ते भाजीपाला व इतर नगदी पिकांकडे वळले आहेत त्यामुळे पुढच्या वर्षी परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. खाजगी क्षेत्राला गव्हाची आयात व वर्धितमूल्य पदार्थांची निर्यात यासाठी परवानगी द्यावी अशीही या व्यापाऱ्यांची मागणी आहे. (इकॉनॉमिक टाईम्स्, १६/७/९२ वरून)

सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या गरजेपोटी १० लाख ५० हजार टन गव्हाची आयात करावी लागली अशी माहिती अन्न राज्यमंत्री श्री. गोगई यांनी अन्न मंत्रालयाशी संलग्न संसदीय सल्लागार समितीला दिली.

शासनाने तांदुळाचीसुद्धा आयात करण्याचे ठरविले आहे; त्यासंबंधी निर्यातदार देशांशी बोलणी चालू आहेत अशी माहिती अन्न मंत्रालयाच्या सूत्रांनी दिली (इंडियन एक्स्प्रेस १७/७/९२ वरून)

एकूणच, इंडिया शासनाचे धोरण असे दिसते की, भले आम्ही कर्जाच्या खाईत बुडू पण शेतकऱ्यांना सुखाने जगू देणार नाही.

# लक्ष्मीमुक्ती कार्यक्रम माहिती संकलनाबाबत

नाशिक येथे झालेल्या शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीच्या बैठकीने गावागावात झालेल्या लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाची सविस्तर माहिती संकलित करण्याचे जबाबदारी जिल्हाप्रमुखांवर सोपविली. संपत्ती अधिकार मिळालेल्या महिलांची संख्या, गावामध्ये लक्ष्मीमुक्ती गौरव समारंभ झाला आहे का?, ७/१२ चे उतारे महिलांच्या नावे झालेत का, झाले नसल्यास त्याची कारणे, इत्यादि गोष्टी या संकलनामध्ये जमा करावयाच्या होत्या. जिल्हा प्रमुखांनी अशा तऱ्हेने संकलित केलेली सर्व माहिती लवकरात लवकर शेतकरी संघटनेच्या आंबेठाण येथील कार्यालयाकडे पाठवावी.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st July, 1992

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
July 21, 1992

To

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

# इंडिया शासनाला राष्ट्रीय कृषिनीतीचे वावडे

वाट पहाणे हा शेतकऱ्याच्या नशिबी आलेला जन्मजात भोग आहे. त्याला पावसाची वाट पाहावी लागते, पाऊस पडत असेल तर तो थांबण्याची वाट पाहावी लागते, कर्जासाठी बँकवाल्यांची, तगाईसाठी भाऊसाहेब-रावसाहेबांची, पीक हाती आल्यावर बाजार-वाल्यांच्या मर्जीची, बाजारभावाची अशी कितीएक बाबींची तो नेहमी वाटच पाहात असतो.

शेतकरी संघटनेने या यादीत आणखी एक भर घातली. म्हणजे काय हे नक्की समजले नसले तरी हल्ली शेतकरी वाट पाहातात 'राष्ट्रीय कृषिनीती'ची. विश्वनाथ प्रताप सिंगांचे सरकार आले-गेले, चंद्रशेखर सरकार जाता जाता देवीलालांनी 'कृषिनीती' च्या नावाने घाईगर्दीत एक मसुदा प्रसूत केला. वाटत होते. आता नव्या खुल्या अर्थव्यवस्थेत तरी शेतीला काही स्थान मिळेल, कारण तशी आशा वाटण्यासारखे आवाहन गेल्या वर्षी नवीन पंतप्रधानांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरुन शेतकऱ्यांना केले - चांगले पिकवा, निर्यात करा, देशाला कर्ज संकटातून वाचवा.

वर्ष उलटले. काही तरी राष्ट्रीय कृषिनीती बाहेर पडेल अशी आशा होती. पण, लोकसभेचे पावसाळी अधिवेशन बहुतेक राममंदिर- बाबरी मशीद आणि 'हर्षद मेहता' खाऊन टाकतील असे दिसते. पण, त्याही पलिकडे 'राष्ट्रीय कृषिनीती' चा विषय या अधिवेशनात न मांडण्याचा डाव आधीपासूनच शिजू लागला होता. गंमत म्हणजे, यालाही खुल्या अर्थव्यवस्थेचेच निमित्त पुढे ठेवलेले होते.

देवीलालांनी राज्यांचे मुख्यमंत्री, कृषिविद्यापीठे इत्यादीकडे ज्या काळात मसुदा पाठविला तेव्हाची परिस्थिती आणि नरसिंहराव शासन सत्तेवर आले तेव्हांची परिस्थिती यांत जमीन अस्मानाचे अंतर आहे; तेव्हांची परिस्थिती नियंत्रित अर्थव्यवस्थेची होती. आताची खुल्या अर्थव्यवस्थेची आहे. त्यामुळे हा मसुदा रद्द करून मुळातून नवा मसुदा तयार करणे आवश्यक आहे. त्यासाठी पुन्हा एखादी समिती नेमून त्या समितीकडून मसुदा तयार करणे आवश्यक आहे. जुना मसुदा सभागृहापुढे मांडणे शहाणपणाचे ठरणार नाही. अशी भूमिका राष्ट्रीय विकास मंडळाने घेतली. त्यामुळे, आता काही राष्ट्रीय कृषिनीतीचा विषय लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात चर्चेला येणार नाही; किंबहुना, तो विषय पुढे कधी चर्चेला येईलच याची खात्री देता येणार नाही अशी चर्चा हे अधिवेशन चालू व्हायच्या महिनाभर आधीपासून कृषिमंत्रालयाच्या परिसरात चालू होती.

त्याही पलिकडे, असे समजते की, विश्वनाथ प्रतापसिंग सरकारने नियुक्त केलेल्या स्थायी कृषि सल्लागार समितीने राष्ट्रीय कृषिनीती संबंधी एक अहवाल सादर केला होता ही गोष्टच केंद्रीय कृषि मंत्रालय नाकारते आहे.

खरे पाहता, देवीलालांचा कृषिनीतीचा मसुदा कसाही असो, पण स्थायी कृषि सल्लागार समितीने तयार केलेला या विषयावरील अहवालाच्या स्वरूपातील 'राष्ट्रीय कृषिनीती' चा मसुदा हा खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणाराच आहे.

शासन भाषा जरी खुल्या अर्थव्यवस्थेची करीत असले तरी धोरणे मात्र तीच जुनी, नेहरू-व्यवस्थेची राबवीत आहे. त्याला कृषि आणि कृषिनीतीशी काहीच देणे घेणे नाही. म्हणून तर शेतकऱ्यांनी शेगाव मुक्कामी 'राष्ट्रीय कृषि नीती' चा स्वीकार केला. तिची अंमलबजावणी आपल्या हिमतीवर करायला सुरुवात करणे यातच शेतकऱ्यांचे, शेतीचे आणि देशाचे भले आहे; शासन ती नीती कधी स्वीकारेल याची वाट पाहण्यात नाही.

# लघुउद्योगाला आता परवान्याची जरूरी नाही

केंद्र शासनाच्या उद्योग मंत्रालयाचे पत्र क्र. ४(१) / ९२ / एस्. एस्. आय्. बी. डी. ता. १० मार्च १९९२ नुसार आणि महाराष्ट्र राज्याच्या उद्योग संचलनालयाचे पत्र क्र. LIC/IND/Policy/92/7847 दि. १ एप्रिल १९९२ नुसार ५० पेक्षा कमी कामगार असलेले लघुउद्योग परवाने इत्यादीसंबंधी सरकारी नियम आणि बंधनातून मुक्त झाले आहेत. त्यामुळे, आता ५० पेक्षा कमी कामगार असलेला लघुउद्योग सुरू करून शेतकरी उसापासून गूळ, खांडसरीचे उत्पादन करणे किंवा इतर शेतीमालावर प्रक्रिया करून पक्का माल बनविणे अशा प्रकारचे व्यवसाय कोणताही परवाना न घेता करू शकतात. मात्र सध्या अस्तित्वात असलेल्या प्रक्रियाउद्योगांवर विपरीत परिणाम होऊ नये यासाठी काही कायदेशीर अटी पाळणे आवश्यक आहे. या अटींसंबंधी सविस्तर माहिती महाराष्ट्र राज्याच्या उद्योगसंचलनालयाकडे मिळू शकेल.

माजघर शेती सुरू करण्याच्या दृष्टीने ही बातमी आशादायक असून शेतीमाल प्रक्रियेच्या लघुलद्योगांवरील बंधने हटविल्यामुळे आता अशा उद्योगधंद्यास इतर उद्योगधंद्याप्रमाणे लघुउद्योग म्हणून नोंदणी करून नवीन औद्योगिक धोरणांतर्गत अनुदान, कमी व्याजात कर्ज इत्यादी सवलती मिळू शकतील.

**वर्गणी पाठविण्याचा व पत्रव्यवहाराचा पत्ता** ➡ शेतकरी संघटक, अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१) ता. खेड, जि. पुणे

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक — मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ — चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
फोन : द्वारा ५०६८२

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ**
**११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.**